# आरे ते बीकेसी मेट्रो ३ ची अग्निशमन दलाकडून सुरक्षा चाचणी पूर्ण

## प्रतीक्षा मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या चाचणीची

▮ **मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यादरम्यान भारतीय रेल्वेच्या संशोधन डिझाईन आणि मानक संस्था अर्थात रिसर्च डिझाईन ॲण्ड स्टॅण्डर्ड ऑर्गनायझेशनच्या चाचण्या पूर्ण झाल्या. यानंतर गुरुवारी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून सुरक्षा चाचण्या पूर्ण करण्यात आल्याचे अधिकृतरीत्या सांगण्यात आले आहे. आता मुंबई मेट्रो रेल प्रायव्हेट लिमिटेडला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या प्रमाणपत्राची अर्थात सीएमआरएसची प्रतीक्षा असल्याचे दिसून आले आहे. येणाऱ्या आठवड्यात सीएमआरएसला चाचण्यांसाठी निमंत्रित करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या अग्निशमन विभागांतर्गत पार पडलेल्या सुरक्षा चाचणीत सर्व मेट्रो स्थानकांसह मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या सर्व इलेक्ट्रिकल कामाची तपासणी करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मेट्रो डब्यात अवजड सामान भरल्यानंतर पहिल्यांदाच संपूर्ण क्षमतेने चालवण्यात आल्या होत्या.



### आरे ते बीकेसी पहिला टप्पा

**स्थानके :** आरे, सिप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय टर्मिनल २, सहार रोड, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय टर्मिनल १, सांताक्रुझ, विद्यानगरी, वांद्रे कुर्ला संकुल.

सध्या प्रकल्पाचे काम ९६ टक्के पूर्ण असून, उर्वरित कामांमध्ये स्थानकांचे सुशोभिकरण, स्थानके आणि फलाटांवरील सुविधा यांचा समावेश आहे. एमएमआरसीएलच्या ताब्यात १९ रेक असून, पहिल्या टप्प्यासाठी पुरेशा आहेत. पहिल्या टप्प्यादरम्यान २६० फेऱ्यांमधून १७ लाख दैनंदिन प्रवासी संख्या असणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

मुंबई मेट्रो मार्ग-३ चा सुधारित प्रकल्प खर्च रु. ३७,२७६ कोटी इतका आहे. यापैकी जायकाचे कर्ज ५७.०९ टक्के म्हणजे रु.२१,२८० कोटी आहे. जायका कर्ज कराराच्या पाचव्या टप्प्याची रक्कम ८४ अब्ज (रु. ४६५७ कोटी) असून, २०१४ पासून सुरू झालेल्या निधी वितरण पूर्ण केले आहे. येत्या १० दिवसांत मेट्रो ३ चे लोकार्पण अपेक्षित असून, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने सुरक्षा चाचण्या सुरू ठेवल्या आहेत.